"वनक्षेत्रपाल" या पदास कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्याबाबत----

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एफडीसी २००४/प्र.क्र.२३/ फ-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ फेब्रुवारी २००४

**प्रस्तावना :**

"वनक्षेत्रपाल" हे वन विभागातील वर्ग-२ चे तालुका स्तरीय अधिकारी आहेत. वनांच्या संरक्षणाची व संवर्धनाची जबाबदारी प्रामुख्याने वनक्षेत्रपाल यांच्यावर असते. यासाठी त्यांचेकडे स्वतंत्र कर्मचारीवृंद कार्यरत असतो. तथापि, त्यांना "कार्यालय प्रमुख" म्हणून दर्जा नसल्याने वनक्षेत्रपाल यांना त्यांचे कर्तव्य अधिक कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी अडचणी निर्माण होत होत्या. यासाठी त्यांना "कार्यालय प्रमुख" म्हणून दर्जा देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

वरील परिस्थितीचा विचार करून शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र १०००/प्र.क्र. ७०/२००१/विनियम, दिनांक १३ जुलै, २००१ सोबत जोडलेल्या परिशिष्टामधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उप विभाग -१ मधील अनुक्रमांक (३) नियम क्र. २ अन्वये सदर नियमातील अटींच्या अधिन राहून व या विभागास असलेल्या अधिकाराचा वापर करून वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) यांना "कार्यालय प्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सं. तु. धाडगे )
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.